MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept.2021
Issue 39, Vol-02

Date of Publication
01 July 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
01 July 2021

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम

You Tube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***









**Govt. of India,**
**Trade Marks Registry**
**Regd. No. 2611690**

**http://www.printingarea.blogspot.com**

# INDEX

01) बालविकास में माता की भूमिका
**मीनू चौधरी & डॉ.चरनजीत कौर, ग्वालियर (म.प्र.) ||09**

02) Rural Healthcare Infrastructure in Nadia District of West Bengal: A Study
**Bipul Chandra Mondal & Dr.Tapati Bhadra (Banerjee), Nadia ||12**

03) Mahatma Gandhi; Review of his versatile personality
**Dr. Galphade Arjun Bhaurao, Dis.Beed ||17**

04) Sculptural practices (Praxis) in Karnataka- A Visual Journey (1900 to ...
**Kangovi Roopa Badrinath ||19**

05) E-BANKING A CHALLENGE TO ELDERLY
**LANDGE SAMEERA ABDULLA ||23**

06) EFFECTIVENESS OF FINANCIAL INCLUSION ON THE GROWTH OF BANKING SECTOR
**Manoj Kumar & Dr. Rajendra K. Khatik, Gwalior (M.P.) ||25**

07) Arabic Education in the University of Calcutta under British Rule
**Dr. Md. Nasir Uddin Mondal, Bamanpukur ||33**

08) The need for a tobacco free period for a healthy society
**Eknath Pawar, Nagpur ||39**

09) Impact of Yoga in Daily Life
**Sapkal R.R., Dist. Jalna ||41**

10) Environmental Laws and Policies related to India
**Ramshankar Varma, Mumbai, India ||43**

11) A Study of factors Influencing Online ShoppingDecision of Consumers in India
**Anubha & Dr.Lokender Singh, Baraut (Baghpat) ||49**

12) E-Teaching - A potential challenge for faculty fraternity during COVID- 19 ...
**Miss Priyanka Bhalla, Sanpada ||54**

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

13) VOICE OF WOMEN IN INDIRA GOSWAMI 'S SELECT NOVELS
**Dr.Laxman Jogdand & Monika Gogoi, Ahmedpur** ||58

14) भारतातील वाढत्या लोकसंख्येची समस्या :— एक अभ्यास
**प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल, जि.भंडारा (म.रा.)** ||64

15) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येच्या कारणांचा समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. यादव घोडके, जि. बीड** ||66

16) चिं.त्र्यं. खानोलकरांचे कादंबरी विश्व: एका प्रयोगशील काव्यात्म मनाचा आविष्कार
**प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने, जि.भंडारा** ||71

17) नाटकसाहित्यप्रकार : उगम आणि वाटचाल
**प्रा.डॉ. शिवाजी रे. एंडाईत, जि. पुणे** ||75

18) विमुक्त जती व भटक्या जमातीच्या सामाजिक-शैक्षणिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास
**प्रा.दिलीप काशिनाथ काठोडे, नवीन नांदेड** ||85

19) सत्यशोधकी मराठी जलसे
**प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले, भंडारा** ||88

20) साक्री तालुक्यातील अहिराणी बोलीच्या ओवीगीतांतून प्रतिबिंबीत झालेले 'भगवान श्रीकृष्णाचे' चित्रण
**प्रा. डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके, जि.धुळे** ||92

21) सरयूपार मैदान (उ.प्र.) में व्यापारिक फसल प्रतिरूप एवं कृषि आधारित उद्योग
**डॉ. अभिषेक सिंह, डॉ. संजीव कुमार सिंह & सीमा सिंह, गोरखपुर (उ.प्र.)** ||94

22) NET/SET परीक्षा संशोधनात्मक अभ्यास
**प्राचार्य डॉ.शेख एस.जे, जि. जळगाव** ||106

23) लोकप्रशासन आणि नोकरशाही
**प्रा.डॉ. केशव दत्तराव तिडके, जि. बीड** ||108

24) एकांकिका : प्रयोगमूल्य
**प्रा.डॉ.नितीन कल्याण मोटे, पुणे** ||111

25) एकांकिका स्वरूपव संकल्पना
**डॉ. नाना झगडे, पुणे** ||116

26) एकांकिकेचे घटक
**डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे, जि. नाशिक** ||119

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

कलात्मक बनू लागली.

मराठी नाट्यवाङ्मयातमराठी एकांकिकेने भर घातली असून मराठी नाट्यवाङ्मय समृद्ध केले आहे. मराठी वाङ्मयातगेल्या ३० ते ३५ वर्षात मराठी एकांकिकेने मोठी कामगिरी केली आहे.मराठी एकांकिकेने समर्थपणे मानवी जीवनदर्शन, अनुभवविश्व, समाजदर्शन प्रकट केले आहे.मराठी एकांकिकाही मराठी नाट्यवाङ्मयाचे आणि रंगभूमीचे एक महत्वपूर्ण, अविभाज्य अंग बनले आहे. दोन—अडीच शतकाच्या वाटचालीची परंपरा असणार्या,मराठी एकांकिकेने प्रगतीचा टप्पा गाठला आहे. मराठी एकांकिकेच्या प्रवासात, मराठी एकांकिकेच्या स्वरूपात विविधतेचे दर्शन घडते.

**संदर्भ:**

१. जोशी सुधा,मतकरी रत्नाकर(संपा.), निवडक मराठी एकांकिका,साहित्य अकादमी नवी दिल्ली, पहिली आवृत्ती, १९८३, पृ. क्र. ४—५.

२. भिडेश्री. र., कुलकर्णीव. दि., केळकरभालबा. (संपा.), एकांकिका वाटचाल, सोमैया पब्लिकेशन्स प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती — १९६९, पृ. क्र. १२.

३. भवाळकर तारा, मराठी नाट्य परंपराः शोध आणि आस्वाद, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती, १९९५,पृ.क्र. ६५.

४. भिडेश्री. र., कुलकर्णीव. दि., केळकरभालबा. (संपा.), एकांकिका वाटचाल, सोमैया पब्लिकेशन्स प्रकाशन, मुंबई,पहिली आवृत्ती — १९६९, पृ. क्र. १३.

५. देशपांडेवि. भा., मराठी नाटकः स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ ते १९९०), व्हीनस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ. क्र. २०६

६. कुलकर्णी, वा. ल., वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९७०, पृ. १६१.

७. कुलकर्णी, वा. ल.,तत्रैव, पृ.१६१.

८. कुलकर्णी, वा. ल.,तत्रैव,पृ.१६१.

९. भिडेश्री. र., कुलकर्णीव. दि., केळकरभालबा. (संपा.), तत्रैव, पृ. ३४

१०. भिडेश्री. र., कुलकर्णीव. दि., केळकरभालबा. (संपा.), तत्रैव, पृ. ३३

११. जोशी सुधा, मतकरी रत्नाकर (संपा.),तत्रैव, पृ. ४—५

26

# एकांकिकेचे घटक

**डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे**
सहा.प्राध्यापक, मराठी विभाग,
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक

**********

एकांकिका म्हणजे नाटकाच्या तुलनेत एका अंकाचे नाटक होय. नाटकामध्ये जास्त अंक असतात. परंतु स्थळ—काळाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाट्यशक्ती एककेंद्रित करणारा, उत्कट, एकसंघ व एकजिनसी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपूर्ण, एक अंकी नाट्यप्रकार म्हणजे एकांकिका होय. एकांकिका हा एक अतिशय महत्त्वाचा कलाप्रकार आहे. दृक—श्राव्य स्वरूपाचा लोकप्रिय कलाप्रकार असल्याने तोप्रेक्षकांपर्यंत लवकर पोहोचतो व त्याचे आकलन प्रेक्षकांना होत असते. मानवाच्या जीवनाचे यथार्थ दर्शन एकांकिकाया कलाप्रकारातून अधिक प्रभावीपणे घडविले जाते. कथा, कविता,कादंबरी व इतर साहित्यापेक्षा नाट्य हा कलाप्रकार अतिशय प्रभावी आहे.इतर साहित्यप्रकारांपेक्षा नाटककार नाटकाची व्याप्ती काळ, वेळ, अभिरुची याला अनुसरून निश्चित करतो. एकांकिकेचा विचार करत असताना एकांकिकेचा लेखक म्हणजेच नाटककार त्या एकांकिकेचा विषय, आशय, दिग्दर्शक, अभिनय, नट, कथानक, भाषाशैली, संवाद व संघर्ष या घटकांचा विचार करून ते एकांकिकेची निर्मिती करत असतो. एकांकिकेच्या स्वरूपाचा अभ्यास करताना आपणास एकांकिकेचे घटकव त्याची वैशिष्ट्ये यांचा विचार करणे महत्वाचे ठरते. एकांकिकेच्या घटकांचा विचार करतांना आपल्याला त्याचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

अ) एकांकिकेचे भाषिक घटक

ब) एकांकिकेचे अभाषिक घटक

**अ) एकांकिकेचे भाषिक घटक**

१. शीर्षक
२. नाट्यबीज
३. भाषा
४. संवाद
५. कथानक
६. संघर्ष

**एकांकिकेचे भाषिक घटक :—**

**१. शीर्षकः—** एकांकिकेचे शीर्षक हा एकांकिकेच्या घटकांतील अतिशय महत्वाचा घटक आहे. शीर्षक वाचल्यावर वा बघितल्यावर लगेचच आपल्याला त्या एकांकिकेत काय दडलेले आहे याचा अंदाज येत असतो. हंडाभर चांदण्या, निर्वासित,उत्तम,मोठा पाऊस आला आणि बुद्रुकवाडीचा मारुती बाटला, ब्रम्हास्त्र अशी काही नवे सांगता येतील. एकांकिकेचेशीर्षक अतिशय महत्वाची भूमिका बजावत असते.

**२. नाट्यबीज :—** प्रत्येक नाटकाला, एकांकिकेला नाट्बीज असते. जाणवलेला विशेष, मानवी जीवनाचा अनुभव किंवाइतर महत्वाचे प्रसंग नाटकात केंद्रवर्ती ठिकाणीमांडण्याचा प्रयत्न नाटककार करत असतो. त्याच्या आश्रयाने इतर मानवी वृत्ती—प्रवृत्ती नाटकात साकारल्या जातात. नाटककार आपल्या अनुभव विश्वातील एखादी सूक्ष्म वा मोठी वृत्ती—प्रवृत्ती अचूक टिपतो. त्या वृत्ती—प्रवृत्तीतून नाटक किंवाएकांकिका जन्म घेत असते.प्रत्यक्ष नाटकातून हे नाट्यबीज पात्रामार्फत साकार होत असते. तसेच पात्रांमधील परस्पर भिन्न वृत्ती—प्रवृत्ती किंवा नाट्य,तसेच संघर्ष पात्रांमार्फत प्रकट होत असतो. स्वाभाविकच नाट्यबीजाचे पात्र, संघर्ष आणि निर्णय असे आंतरिक घटकही आपल्याला दिसून येतात. नाटककार मानवी जीवनात आलेल्या अनुभवांचे दर्शन आपल्या नाटकातून किंवा एकांकिकेतून घडविण्याचा प्रयत्न करत असतो. मानवी जीवनामध्ये किंवासमाजात ज्या काही वृत्ती—प्रवृत्ती वेगवेगळ्या ठिकाणी नाटककाराला आपल्या अनुभूतीतून जाणवलेल्या असतातय त्या सगळ्या वृत्ती—प्रवृत्ती नाटककार हेरत असतो आणि त्यातून त्यालाजेबीज मिळते तेच नाट्बीज होय. नाटककाराला हे नाट्यबीज अस्वस्थ करत असते. त्या अस्वस्थतेतून नाटकाचा किंवाएकांकिकेचा जन्म होतो. मग तोनाटकाचा प्रकार कुठलाही असो. प्रत्येक नाटकाच्या प्रकारात असे नाट्यबीज दडलेले असते. नाट्यबीज हा नाटकाचा अविभाज्य व केंद्रवर्ती असा घटक आहे. नाट्यबिजाशिवाय नाटक आकारच घेऊ शकत नाही.

**३. भाषा:—**एकांकिकेचे कथानक हे घटना—प्रसंगातून आकाराला येत असते. एकांकिकेतील घटना—प्रसंगांचे चित्रण मुख्यतः संवादातून साकारत असते. संवादातून एकांकिकेतील व्यक्तिरेखेचा स्वभाव व कृती स्पष्ट होत असते. एकांकिकेतील घटना—प्रसंग हे विशिष्ट कार्यकारणभावाने एकत्र जोडलेले असतात. एकांकिकेतील सर्वच्या सर्व माध्यमे ही भाषेशी संबंधित आहेत. म्हणूनच एकांकिकेचा भाषा हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे.भाषेच्या माध्यमातून एकांकिका प्रेक्षकांसमोर उलगडत जाते. एकांकिका साकारणीतील किंवा एकांकिका प्रक्रियेतील भाषा हे एक महत्त्वाचे अंग आहे. एकांकिकेत भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. एकांकिकेतील भाषा अति अलंकृत असू नये. तसेच ती साधी सुद्धा नसावी. घटना—प्रसंगांची खोली वाढविणारी भाषा हवी. एकांकिकेतील व्यक्तिरेखेला अनुसरून तिचा स्वभाव, विशेषणे यांना जुळवून घेणारी अशी एकांकिकेची भाषा असणे गरजेचे आहे. एकांकिकेतील एखादे अशिक्षित पात्र अलंकारिक बोलू लागले तर एकांकिकेला महत्त्व प्राप्त होणार नाही. कधी—कधी प्रतिष्ठित पात्रांच्या तोंडी जर साधी भाषा आली तर ती शोभा देणार नाही. नाटकाच्या किंवा एकांकिकेच्या भाषेत सूचकता, सहजता आणि सफाईदारपणा हे गुणधर्म असले पाहिजे. या गुणधर्मांनी नियुक्त असणारी भाषा एकांकिकेत प्रभावी ठरत असते. नाट्य विषयाला अनुकूल अशी विशिष्ट प्रकारची भाषा त्या एकांकिकेमध्ये वातावरणास पोषक असते. कधी —कधी बोलीभाषांचा वापर, कामगार नाट्य असेल तर कामगारांची भाषा, दलितांची भाषा, मजुरांची भाषा, ग्रामीण शेतकऱ्यांची भाषा, मुलांची भाषायकिंवा समाजामध्ये विविध स्तर आहेत, या विविध स्तरातील भाषेचा योग्य रीतीने वापर नाटककाराने करून घेतला पाहिजे.ज्या समाजघटकातील व्यक्तिरेखा आपण त्या एकांकिकेसाठी निवडलेल्या आहेत, त्या समाजघटकातील

बोली, वाक्प्रचार,म्हणी, उखाणे या सर्वांचा अर्थपूर्ण रीतीने वापर करून घेतला पाहिजे. नाट्यघटकातील एक महत्त्वाचे अंग म्हणून नाटकातील भाषाही अर्थगर्भ असली पाहिजे. अशा प्रकारच्या भाषेमुळेच आपल्याला एकांकिकेतील नाट्यउकल होताना दिसत असते. भाषा हे संवादाचे माध्यम आहे आणि भाषेमुळेच नाटकाला स्पष्ट रूप प्राप्त होते. भाषेला एक निश्चित अर्थ असतो,सामाजिक संदर्भ असतो, सांस्कृतिक संचित असते आणि नाट्यभाषेतून संप्रेषणाचे भावनाविष्काराचे कार्य होते. एकांकिकेतून अर्थसूचकता व्यक्त होत असते. अशा तऱ्हेने भाषा हा नाट्यघटक निरनिराळी कार्ये करून नाट्यरस संपन्न व समृद्ध करत असतो.

४. **संवाद**:— नाटकात संवादाला अतिशय महत्वाचे स्थान असते. कथानकाला एकसंघ ठेवणे व कथानकाची उकल करून त्या कथानकाला गती देण्याचे कार्य संवाद करीत असतात. एकांकिकेतील व्यक्तिरेखा संवादाच्यामाध्यमातूनच प्रेक्षकांपुढे स्पष्ट होत जातात. रंगमंचावरील घडामोडी संवादाच्या माध्यमातून प्रत्यक्ष सादर होत राहतात. रंगमंचाबाहेरीलघटना—प्रसंगसुद्धा संवादाच्या माध्यमातून माहिती होत जातात. प्रत्येक नाटकामध्ये किंवा एकांकिकेमध्ये नाटकातील संवाद हेघटना, प्रसंग, व्यक्ती यांचे एकात्मदर्शन घडविताना दिसतात. एकांकिकेच्यासुरुवातीला कथानक पार्श्वभूमी निर्माण करत असते. त्याचे काम संवादाच्या माध्यमातून चालत असते. ज्या नाट्यकृतीला वाङ्मयीन व प्रायोगिक मूल्य आहे, अशा नाट्यकृतीमध्ये संवाद हे सत्याचे आभास निर्माण करून मानवी जीवनातील संघर्ष रेखाटण्याचे कार्य करतात.रंगमंचावरची पात्रांची वाक्ये ही प्रेक्षकांच्या हृदयापर्यंत भिडतात. त्यासाठी नाटककार प्रत्येक संवादातून उठावदार विनोद, कोटी, उपहास, उपरोध यांचा प्रभावीपणे वापर करत असतात. नाट्यकलेत नाटकाला योग्य असे मोजके घटना व प्रसंग निवडून त्यावर नाट्य निर्माण करावे लागते. संवाद त्यासाठी उपयुक्त ठरतात. घटना व प्रसंग यांची परिणामकारकता साधण्यासाठी संवाद हा घटक महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक पात्राच्या मनात असणारी गुंतागुंत, पात्रांचे भावविश्व व संघर्षमय भावना या संवादाच्या माध्यमातूनच रंगमंचावर व्यक्त होत असतात. त्यामुळेच संवादालामहत्त्वाचे स्थान प्राप्त होताना दिसते. संवाद हेनाट्यला अर्थपूर्ण तसेच सौंदर्यपूर्ण बनवितात.नाट्यातील संवाद विशिष्ट संदर्भातून तसेच परिस्थितीसापेक्ष काळ व स्थळ यांच्या संदर्भात अर्थपूर्ण होताना दिसतात.पात्रांच्या मनातील भावविश्व, भावना यांची अभिव्यक्ती संवादातून व्यक्त होत असते. एखादे पात्र आंतरिक पातळीवर प्रकर्षाने जगत असेल तेव्हा नाटककार त्या पात्राच्या मुखी स्वगत संवाद देत असतो.

५. **कथानक**:— कोणत्याही नाटकामध्ये कथानक हे महत्त्वपूर्ण असते. कथानकाशिवाय नाटक असूच शकत नाही. नाटककाराला नाटकाचे कथानक त्याच्याभोवती असणारा समाज, संस्कृती आणि वातावरण यांमधून सुचते. नाटककाराला प्रेक्षकांना प्रगल्भता व नाट्यनुभव मिळवून द्यावयाचा असतो. कथानकामध्ये गती व भाव महत्त्वाचाअसतो. स्वाभाविकता आणि मौलिकता या गोष्टींनी मिळून नाटक परिणाम साधत असते. नाटककार नवनवीन कथानक शोधत असतो. या नवीन कथानकामुळे नाटकाला मौलिकता लाभते.नाटककाराच्या दृष्टीनेएखादा विषय हा नाट्यविषय होऊ शकतो. कथाकाराला एखाद्या विषयावर कथा सुचते.एखाद्या कादंबरीकाराला त्या विषयावर कादंबरी लिहावी असे वाटते. पण अस्सल नाटककार त्या कथानकात नाटक वा एकांकिका पाहत असतो. मराठीत एकाच विषयावर अनेक कथा, नाटके, कादंबऱ्यानिर्माण झालेल्या आहेत. नाटककार त्यातून संघर्ष निर्माण करत असतो आणि नाटकाचा उत्कर्षबिंदू हा कथानकाने साधला जातो. कथानक हे नाटक व एकांकिकेचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे.भरतमुनी यांनी नाट्य—घटकांचा विचार करताना नाट्य—कथानक याला नाट्य—वस्तू असा शब्द वापरला होता. वस्तू हा शब्द म्हणजे 'राहणे' या संस्कृत धातूपासून निर्माण झाला आहे.याला अनुसरून नाटकाचे वस्तू किंवा कथाभाग हे शब्द स्वरूपाने राहण्याचे ठिकाण आहे. जीवाला ज्याप्रमाणे शरीरामुळे दृश्य स्वरूप प्राप्त होते, त्याचप्रमाणे नाट्यला कथानकाच्या योगानेच दृश्य स्वरूप प्राप्त होते.नाटकाच्या कथानकाचे ऐतिहासिक, काल्पनिक तसेच मिश्र असे तीन भेद मानले जातात. एकूणच कथानक हा भाग नाटक व एकांकिका यामध्ये अतिशय महत्वाचा आहे.

**६. संघर्ष:—** रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग असे संत तुकारामांनी एका अभंगात म्हटले आहे. मानवीजीवन म्हणजे संघर्ष आहे. संत तुकारामांनी युद्ध हा शब्द संघर्ष या अर्थाने वापरलेला आहे. साहित्यामध्ये मानवी मनाच्या व जीवनाच्या निरंतर संघर्षाचे चित्रण मोठ्या प्रमाणात आलेले दिसूनयेते.नाट्यकलाकृतीमध्ये संघर्ष हा नाट्यचाप्राणघटक आहे. संघर्षाला नाटकाचा आत्मा असेही म्हटले जाते. संघर्षाचासहसंबंध हापात्रांच्या वर्तणुकीशी येतो.नाट्यकलाकृतीमध्ये संघर्ष हा दुर्जनाविरुद्ध असतो. समाज व मूल्यव्यवस्था जर नाट्यपात्रांच्या उद्धीष्ठाच्या आड येत असेल तर संघर्ष निर्माण होताना दिसतो.प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरुद्ध एकांकिकेतील पात्रांचा संघर्ष सुरू असतो. समाजव्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी काही पात्रे किंवा प्रधान व्यक्तिरेखा काही गोष्टींना विरोध करतात, तेव्हा आपल्याला संघर्षाची सुरुवात होताना दिसते. मुख्य व्यक्तिरेखा आपल्या प्रेरणा आणि कृती यांच्या माध्यमातून प्रस्थापित मूल्यव्यवस्थेला व समाजव्यवस्थेला धक्का देण्याचे काम करत असतात. प्रस्थापित व्यवस्था मोडीत काढून नवीन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न इथे सुरू होतो. संघर्ष हा अटळ असतो. वास्तविक मानवी जीवनामध्ये संघर्ष हा ओतप्रोत भरलेला आपल्याला दिसतो आणि तोच संघर्ष नाटकांमध्ये आलेला आहे.मात्र पात्रांमधील समज—गैरसमज, संवेदनशीलता, संवेदनशून्यता याच्या विरोधाभासामुळे काही पात्रांचे मानसिक संतुलन ढळलेले असते. काही पात्रांच्या मनामध्ये द्वंद्वचालू असते.अशा अनेक कारणांमुळे नाटकांमध्ये संघर्ष निर्माण होत असतो. हा संघर्ष व्यक्ती—समाज यांच्याविरुद्ध असू शकतो. व्यक्ती—व्यक्ती यांच्याविरुद्ध असू शकतो किंवा व्यक्तीविरुद्ध कालबाह्य चाली, रीती, रूढी व परंपरा यांच्यातला सुद्धा असू शकतो. यामुळेच नाट्यतअतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे संघर्ष होय.

**ब) एकांकिकेचेअभाषिक घटक:—**

१. नाटककार
२. नट आणि अभिनय
३. दिग्दर्शक
४. पार्श्वसंगीत व ध्वनी संकलन
५. नेपथ्य आणि रंगमंच व्यवस्था
६. वेशभूषा
७. प्रकाश योजना व रंगभूषा
८. प्रेक्षक व प्रेक्षागृह
९. रंगभूषा

**१. नाटककार:—**एकांकिका हा एक कलाप्रकार आहे. या कलाप्रकारावर लेखक संस्कार करत असतो. रंगभूमीचा आवाका आणि मर्यादा लक्षात घेऊन लेखक एकांकिकेचे लेखन करीत असतो. एखादे नाट्यबीज घेऊन या एकांकिकेला तो जन्म देत असतो. मुख्यत: एकांकिका रंगभूमीवर सादर होण्यापूर्वी त्या लेखकाकडून वाङ्मयरुपात रंगभूमीची जाणीव लक्षात घेऊन त्याच्या मनात ती एकांकिका आकार घेत असते. एकांकिकेचा विषय निवडण्यापासून पात्रे किती ठेवायची?, घटना, प्रसंग, संवाद, संघर्ष कसा रेखाटायचा?य तसेच एकांकिकेमध्ये किती प्रवेश घ्यायचे?,ध्वनीयंत्रणा, भाषाशैली, प्रकाशयोजना, संगीत,प्रेक्षक आणि एकांकिकेचा शेवट या सर्व बाबींचा विचार लेखक करत असतो. एकांकिकेचा लेखक हा तत्वज्ञ असतो. सूक्ष्म निरीक्षणशक्ती त्याच्याकडे असते. त्याच्याकडे असणाऱ्या या सर्व गोष्टींचा उपयोग एकांकिका लिहिताना तो करून घेत असतो.

**२. नट आणि अभिनय:—**नाटककाराने एकांकिके मध्ये एक विषय मांडलेला असतो.आशय, विषय व संघर्ष एकांकिकेमार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नटांची गरज भासत असते. नट हे अभिनय करत असतात. एकांकिकेसाठी नट आणि त्यांचा अभिनय हा अविभाज्य घटक आहे. नाटककाराने लिहिलेले नाटक, एकांकिका प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नट हेच महत्त्वाचे असतात. त्यासाठी त्यांचा अभिनय इथे उपयोगी पडू शकतो. अभिनयाबरोबरच रंगभूमीच्या तांत्रिक गोष्टींचेसुद्धा ज्ञान व्यावसायिक नटाजवळ असते.या ज्ञानाचा उपयोग करून नट एकांकिका प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत असतात. नट एकांकिकेत असणाऱ्या पात्रांच्या भूमिकेमध्ये एकरूप होऊन, अतिशय दर्जेदार अभिनय करून प्रेक्षकांपर्यंत विषय, आशय व संघर्ष पोहोचवत असतात. नटांचाअभिनय प्रेक्षकांना सुखात्मिका असेल तर आनंद देऊन जातो. दुखात्मिका असेल तर करुण

रसामध्ये बुडवून जातो. नट व अभिनय ही गोष्ट नाटक व एकांकिकेसाठी अतिशय महत्त्वाची आहे.

**३. दिग्दर्शक**:—एकांकिका लिहिल्यानंतर त्या एकांकिकेतील आशय, विषय व संघर्ष प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम दिग्दर्शक करत असतो. एकांकिका ही एक वाङ्मयीन कलाकृती असते. या कलाकृतीचे रंगमंचावर प्रयोग करताना दिग्दर्शकाला एकांकिकेच्या सर्व अंगांचा परिपूर्ण अभ्यास करावा लागतो. एकांकिकेचे कथानक, एकांकिकेतील पात्रे,त्या पात्रांचे स्वभाव, पात्रांची बोलण्याची सवय, देहबोली, मुद्राभिनय, संवाद, इतर पात्रांनी संवादाला दिलेला प्रतिसाद, रंगमंचाची मांडणी, प्रकाश, संगीत,वेशभूषा, केशभूषा,एकांकिकेचा परमोच्च बिंदू,एकांकिकेचा एकूण परिणाम,प्रेक्षकांचा दर्जा,प्रेक्षकांचा वयोगट, प्रेक्षकांची अभिरुचीइ. एकांकिकेशीसंबंधित सगळ्या गोष्टींचे ज्ञान त्या दिग्दर्शकाला असणे गरजेचे आहे.एकांकिकेमध्ये अनेक रंग भरून तीएकांकिका जिवंत करता आली पाहिजे.लेखकाला जे म्हणायचे आहे, ते दिग्दर्शकाला परिपूर्ण समजलेय तर तो रंगभूमीवरून तंत्राच्या साह्याने, पात्रांच्या अभिनयाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकतो. दिग्दर्शक हा एकांकिकेचा लेखक व प्रेक्षक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा असतो.

**४. पार्श्वसंगीत व ध्वनी संकलन** :—पार्श्वसंगीत व ध्वनी संकलन हे तांत्रिक घटक आहेत. भरतमुनी यांनी सुद्धा संगीतालामहत्त्व दिलेलेदिसूनयेते. सुरुवातीला लोकसंगीतातून नाटकाचा जन्म झाला असे सांगितले जाते. नाटकाच्या जन्मापासून नाटकांमध्ये संगीताचा वापर केला जात होता. अनेक नाटकांमध्ये संगीताला अतिशय महत्त्व होते. नंतरच्या काळात संगीत नाटकेही मोठ्या प्रमाणामध्ये लिहिली गेली. नाटकांमध्ये पार्श्वसंगीत आणि ध्वनीसंकलन या गोष्टी अतिशय महत्वाच्या आहेत. संगीताचे दोन प्रकार नाटकात वापरले जातात. एक जिवंत संगीत आणि दुसरे ध्वनिमुद्रित संगीत हेते दोन प्रकार होय. एकांकिकेतील प्रसंगाचे उठावदार, प्रभावी सादरीकरण करण्यासाठी पार्श्वसंगीताचा वापर केला जातो. करुण रसात्मक प्रसंग, आनंदी प्रसंग वा रहस्यमय हालचाली असतील तर त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या पार्श्वसंगीताचा उपयोग केला जातो. सूचक व अनुरूप संगीत नाट्यतयोजले जाते.त्यातून उच्च प्रतीचे नाट्य निर्माण होते.पार्श्वसंगीत आणि ध्वनी संकलन यामुळे नाटकांमध्ये परिणाम साधता येतो

**५. नेपथ्य आणि रंगमंच व्यवस्था** :— नेपथ्यहा नाटकामधील अतिशय महत्त्वाचा भाग आहे. भरतमुनींनी नाट्यशास्त्र या ग्रंथात नेपथ्य आणि रंगमंच याविषयी सविस्तर विवेचन केलेले आहे. नाट्यगृहाचेदोन भाग पडतात. एका भागामध्ये प्रेक्षक बसतात, तर दुसऱ्या भागात रंगमंच असतो.प्रेक्षागृह आणि रंगमंचयामध्येपडदा असतो. आजच्या काळामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने तंत्रशुद्ध असे नाट्यगृह तयार केलेले आहेत. कधी—कधी फिरते आणि सरकते रंगमंच यामुळे काही क्षणात दोन वेगवेगळी दृश्ये सुद्धा दिसत असतात. तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे आजकाल रंगमंचावर मोजका सेट उभारला जातो.नेपथ्याच्यायोग्य उभारणीमुळे एकांकिकेमध्ये परिणामकारकता साधता येते. नेपथ्यकार बारकावे बघून नेपथ्य करीत असतात. एकूणच रंगमंच व्यवस्थाआणि नेपथ्य या दोन्ही गोष्टी नाट्यशास्त्रामध्ये महत्त्वाच्या आहेत.

**६. वेशभूषा**:—एकांकिकेमध्ये पात्रांचीवेशभूषा ही गोष्ट महत्त्वाची आहे. एकांकिकेचा काळ येथे महत्वाचा आहे. त्या काळावर आधारित वेशभूषेचा विचार केला जातो. नाटक जर पुराण काळातील असेल, तर वेशभूषा ही पुराणातील असली पाहिजे. आधुनिककाळातील नाटक असेल तर आधुनिक काळात जशी वेशभूषा असेल तशी वेशभूषा केली जाते. प्रत्येक काळामधील पात्रांची सामाजिक स्थिती, तत्कालीन पेहराव, गळ्यात घालायचे अलंकार आदींचा सूक्ष्मपणे नाटककार व दिग्दर्शक विचार करतात आणि तशी वेशभूषा केली जाते. समाज वाइतिहास यांचा विचार करून प्रादेशिक व्यक्तिरेखा साकारतानावेशभूषेचा विचार केला जातो.ते नाटकाची गरज ओळखून विविध व्यवसायातील, प्रांतातील स्त्री—पुरुषांच्या वेशभूषा, अलंकार यांचा अभ्यासपूर्ण वापर नाटक व एकांकिकेमध्ये लेखक आणि दिग्दर्शक करत असतात.

**७. प्रकाशयोजना व रंगभूषा** :—प्रकाशयोजना हा पूर्णपणे तांत्रिक घटक आहे. आजच्या काळातील रंगमंचावरील प्रकाशयोजनेसाठी आधुनिक कौशल्यांचा

वापर केला जातो. पूर्वीच्या काळी मात्र प्रकाशयोजनेसाठी पारंपरिक साधनांचा वापर केला जात होता. आजच्या काळात तंत्रशुद्ध प्रकाश योजनेचा वापर केला जातो. जनरल लाईट,ड्रीमर स्पॉटलाईट, सोलर, डिस्कोलाइट, मिररवॉल, फोकस, मिररस्पॉट या प्रकाशाच्या काही साधनांचा कौशल्याने वापर एकांकिकांमध्ये केला जाताना दिसतो. सादरीकरणाच्या वेळी प्रकाशयोजनेमुळे घटना—प्रसंग यांचे योग्य परिणाम दाखविले जातात. स्वप्नदृश्य दाखविण्यासाठी प्रभावी प्रकाशयोजनेचा वापर केला जातो. वर्तमान रंगमंचावर अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रकाशयोजनेचा कल्पक वापर करून नाटक अधिक प्रभावी केले जाते.

**८. प्रेक्षक व प्रेक्षागृह** :—प्रेक्षक व प्रेक्षागृह हा घटकनाटकामध्ये महत्त्वाचा घटक आहे. प्रेक्षकांशिवाय नाटक होऊच शकत नाही. प्रेक्षकांना बसण्यासाठी प्रेक्षागृह अतिशय चांगले हवे. सर्व सोयीसुविधा तेथे असाव्यात.आवाज व्यवस्थित पोहोचणे गरजेचे आहे. प्रेक्षागृहात पुरेसाप्रकाश असणे,वातानुकुलीत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे ठरते. अशा सर्व सुविधा असतील तर प्रेक्षक नाटकाला गर्दी करतात.

**९. रंगभूषा**:—रंगमंचावर काम करणाऱ्या नटाचा चेहरा स्पष्टपणे दिसावा यासाठी रंगभूषा महत्वाची असते. पात्रांच्या चेहऱ्यावरील हावभाव प्रेक्षकांना व्यवस्थित दिसावेहाच रंगभूषेचामहत्त्वाचा उद्देश असतो. रंगमंचावर प्रकाशझोतात रंगभूषेशिवाय व्यक्तिरेखेचा चेहरा उठावदार दिसत नाही. नाटकातील पात्र म्हणजेचनटांच्या वर्णनानुसार रंगभूषा म्हणजेच मेकअप करावा लागतो. कथानकामध्ये जर एखादे पात्र म्हातारे दाखविलेले असेल आणि त्याची भूमिका करणारा नटतरुण असेल तर त्याला रंगवावे लागते. त्यासाठी त्या पात्राचा सामाजिक दर्जा व स्वभाववैशिष्ट्ये, नाटकातील काळ या सगळ्या गोष्टींचा विचार करून रंगभूषा करावी लागते. रंगभूषेसाठी योग्य रंगांचा वापर करणे, पात्रानुसार रंगछटांची निवड करणे हेसुद्धा महत्वाचे असते. रंगभूषेत चेहऱ्याशिवाय शरीराचा जो भाग प्रेक्षकांसमोर येतो त्याची सुद्धा संगती चेहऱ्याच्या रंगसंगतीशी जुळवावी लागते. अभिनयाला रंगभूषेची जोड देणे गरजेचे असते. त्यामुळे नाटक परिणामकारक होत असते.

एकूणच नाटक या साहित्यप्रकारात नाटकाचे भाषिक व अभाषिक असे दोन्ही प्रकारचे घटक अतिशय महत्वाचे ठरत असतात. नाटक रंगमंचावर आणण्यासाठी दिग्दर्शकाला अभाषिक घटकांवर भर द्यावा लागतो. तर लेखकाला नाटक लिहितांना भाषिक घटकांचा वापर करावा लागतो. नाटक हे दृक—श्राव्यमाध्यम आहे. ते रंगमंचावर येण्यासाठी व प्रेक्षकांच्या मनपसंतीस उतरण्यासाठी भाषिक व अभाषिक असे दोन्ही प्रकारचे घटक महत्वाचे ठरत असतात.

**संदर्भ**:—

१. प्रदक्षिणा खंड दुसरा — सावाना नाशिक, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे,

२. मराठी नाट्य समीक्षा — रा. श. वाळिंबे

३. मराठी वाड्मयाचा इतिहास — अ. ना. देशपांडे

४. मराठी रंगभूमी मराठी नाटक — घटना आणि परंपरा(अ. ना. भालेराव स्मृतिग्रंथ) संपादक:के. नारायण काळे, वा. ल. कुलकर्णी

https://vishwakosh.marathi.gov.in/24818/

❑❑❑